महाराष्ट्र पोलीस

पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर
तीन हात नाका, एल.बी.एस.मार्ग, नौपाडा, ठाणे (पश्चिम)
दुरध्वनी क्रमांक – ०२२–२५४०१०५६
Email ID – cp.thane.dcptraffic@mahapolice.gov.in

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

जा.क्र. पोउपआ/वावि/अधिसूचना/ ०२ /२०२४ दि. ०५/०१/२०२४

**—: वाहतूक नियंत्रण अधिसुचना :—**

**ज्याअर्थी,** डोंबिवली वाहतूक उप विभागाचे हद्दीत दि. ०७/०१/२०२४ रोजी '**पोलीस वर्धापन दिनानिमित्त**' सकाळी ०५:०० ते ११:०० वा. पावेतो डोंबिवली पूर्व शहरामध्ये बाजी प्रभु चौक, फडके रोड, मदन ठाकरे चौक, गणपती मंदिर, अप्पादातार चौक येथे '**हॅप्पी स्ट्रीट**' कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येणार आहे. तसेच सदर कार्यक्रमात मोठया संख्येने पोलीस अधिकारी, अंमलदार, महिला, व नागरिक सहभागी होणार आहेत. सदर परिसरात वाहतूक कोंडी होऊ नये व परिसरातील वाहतूक सुरळीत व सुनिश्चित राहणे आम जनतेच्या सोईसाठी आवश्यक आहे.

**त्याअर्थी, मी डॉ. विनयकुमार मे. राठोड, पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर** म्हणून, मला महाराष्ट्र शासन गृहविभाग क्र. एम.व्ही.ए.–११६/सीआर/३७/टीआर, दि. २७/०९/१९९६ चे अधिसुचनेनुसार मोटार वाहन कायदा कलम ११५, ११६ (१) (अ) (ब) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करून पुढीलप्रमाणे अधिसुचना जारी करीत आहे :—

**प्रवेश बंद —** १) कल्याण डोंबिवली महानगर पालिकेच्या फडके रोड वरील बाजीप्रभु चौक ते आप्पा दातार चौक पर्यंत येणाऱ्या सर्व प्रकारच्या वाहनांना **फडके रोड** येथे '**प्रवेश बंद**' करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग —** सदरची वाहने ठाकुर्ली जोशी हायस्कुल समोरील रोडने नेहरूरोड मार्गे स्टेशन कडे तसेच फडके रोड कडे येणारी वाहने ही टिळक रोडने, सावरकर रोडने इंदिरा चौक मार्गे व स्टेशन परिसरातून इच्छित स्थळी जातील.

सदर वाहतूक अधिसुचना दि. ०७/०१/२०२४ रोजी सकाळी ०५:०० ते ११:०० वाजेपावेतो अंमलात राहील.

सदरची वाहतूक नियंत्रण अधिसुचना पोलीस वाहने, फायर ब्रिगेड, रुग्णवाहिका व इतर अत्यावश्यक सेवेतील वाहनांना लागु राहणार नाही.

( डॉ. विनयकुमार मे. राठोड )
पोलीस उप आयुक्त,
वाहतूक विभाग, ठाणे शहर.

**प्रति,**

जिल्हा माहिती अधिकारी, जिल्हा माहिती अधिकारी कार्यालय, ठाणे.
२/– सदरची अधिसुचना प्रसिध्द करण्यास विनंती आहे.

**प्रत माहितीसाठी सविनय सादर**

मा. पोलीस आयुक्त, ठाणे शहर
मा. पोलीस सह आयुक्त, ठाणे शहर
मा. जिल्हाधिकारी, ठाणे

**प्रत माहितीस्तव सविनय सादर —**

मा. अपर पोलीस आयुक्त, पूर्व प्रादेशिक विभाग, कल्याण.
प्रादेशिक परिवहन अधिकारी, ठाणे, कल्याण.
पोलीस उप आयुक्त, परिमंडळ – ३, कल्याण.
पोलीस उप आयुक्त, विशेष शाखा, ठाणे.
परिवहन व्यवस्थापक, कल्याण–डोंबिवली महानगरपालिका, कल्याण
विभाग नियंत्रण कक्ष, राज्य परिवहन विभाग, ठाणे/कल्याण
नियंत्रण कक्ष, ठाणे/कल्याण शहर

CamScanner

**प्रत** :— पोलीस उप आयुक्त, आर्थिक गुन्हे शाखा, ठाणे शहर
२/— सदरची अधिसुचना नागरीकांच्या माहितीसाठी ठाणे शहर पोलीस वेबसाईटवर प्रसिध्द होणेस विनंती आहे.

**प्रत कार्यवाहीस्तव सविनय सादर,**
मा. आयुक्त, कल्याण—डोंबिवली महानगरपालिका, कल्याण
२/— आपणास विनंती करण्यात येते की, आपण मोटार वाहन कायद्याचे कलम १६१ (१) (अ) (ब) अन्वये संबंधीत ठिकाणी पार्किंग फलक लावणेबाबत आपले अधिनस्थ संबंधीतांना आदेश निर्गमित करावेत.

**प्रत** :— समन्वय अधिकारी, ९ ए. एस. कक्ष, ठाणे.
२/— सदरची अधिसुचना पोलीस नोटीसमध्ये प्रसिध्दीसाठी.

**प्रत** :— स.पो.आ. कल्याण वाहतूक विभाग/पोनि कोळशेवाडी, कल्याण, डोंबिवली, वाहतूक उपविभाग.

CamScanner